पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह गहिनीनाथ बावनकर, पो.अं. राम पवार आणि मंगेश शिंदे यांनी कारवाई करून पिडीताला दिलासा दिला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# विविध मागण्यांसाठी शेकापचा नगरपरिषदेवर मोर्चा

## मागण्या मान्य करण्याचे मुख्याधिकारी यांचे लेखी आश्वासन

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड शहरातील नागरिकांच्या विविध प्रलंबित मागण्या व समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) वतीने सोमवारी (११ ऑगस्ट) वाजतगाजत घोषणाबाजीसह भव्य मोर्चा काढण्यात आला. शहरातील मुख्य मार्ग व बाजारपेठेतून मार्गक्रमण करत मोर्चा थेट नगरपरिषदेवर धडकला.

शेकापचे राज्य मध्यवर्ती सदस्य तथा शहर चिटणीस असदभाई बल्खी यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चाला मोठ्या संख्येने नागरिक व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मागण्यांचे निवेदन सादर केल्यानंतर मुख्याधिकारी यांनी सर्व मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन मोर्चेकऱ्यांना दिले.




प्रमुख मागण्यांमध्ये - प्रत्येक वार्डात घंटागाडी नियमित व वेळेवर सुरू करणे, सफाई कामगारांची महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी, मुख्य बाजारपेठेत अवजड वाहनांना दिवसाची बंदी, अमृत जलयोजनेअंतर्गत प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे, ट्रॅव्हल्सची शहराबाहेर पार्किंग व्यवस्था, आठवडी बाजारासाठी फिरते शौचालय, मास विक्रेत्यांसाठी नपाचा कत्तलखाना, कब्रस्तानात पाणी व वीजपुरवठा अशी मुद्दे आहेत.

या मोर्चाला महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लाल बावटा), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, प्रहार जनशक्ती पक्ष, एसएफआय, डिवायएफ, राष्ट्रीय अल्पसंख्याक समिती, एपीजे अब्दुल कलाम समिती आदी पक्ष व संघटनांचा पाठिंबा मिळाला. मोर्चा यशस्वी करण्यासाठी शेकाप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हर घर तिरंगा उपक्रमातंर्गत परभणी शहरात विद्यार्थ्यांची भव्य तिरंगा सायकल रॅली संपन्न




परभणी ।प्रतिनिधी

हर घर तिरंगा उपक्रमातंर्गत जिल्हा प्रशासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या विद्यमाने परभणी शहरात आज सकाळी तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांच्या हस्ते करण्यात आला. रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात जिल्हा क्रीडा संकुल येथून झाली. ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, विसावा कॉर्नर मार्गे गांधी पार्क, शिवाजी चौक येथुन जनता मार्केट, ग्रॅन्ड कॉर्नरवरुन महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा मार्गे जिल्हा क्रीडा संकुल येथे सायकल रॅलीची समारोप झाला. रॅलीत विविध देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या.

यावेळी वाहतुक शाखा पोलीस निरीक्षक वामन बेले, महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.आर.जाधव, तालुका क्रीडा अधिकारी कल्याण पोले, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर आदी उपस्थित होते.रॅलीत गांधी विद्यालय, भारतीय बाल विद्यामंदीर, डॉ. जाकेर हुसेन विद्यालय, खो-खो प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील धिरज नाईकवाडे, योगेश आदमे, भागवत दुधारे, प्रकाश पंडित यांनी परिश्रम घेतले.

# पेणकरांचा जनआक्रोश मोर्चा महावितरण कार्यालयावर धडकला

गडब/ सुरेश म्हात्रे

वडखळ, बोरी, शिर्की, वाशी, काराव, शिहू, हमरापूर या विभागांतील नागरिक वीज वितरण कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे हैराण झाली होती, माजी अर्थ व बांधकाम सभापती संजय जांभळे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी महावितरण कंपनीच्या हुडको पेण येथील कार्यलयावर धडक दिली.



संजय जांभळे यांनी मागणी केल्या १० मागण्यांना वीज वितरणच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून त्यांना याबाबत लेखी पत्र दिले आहेवारंवार बीजपुरवठा खंडित होणे, चुकीची बिले, धोकादायक विद्युत उपकरणे आणि इतर अनेक गंभीर समस्यांमुळे नागरिक संतप्त झाले आहेत. श्रावण आणि गणेशोत्सवाच्या तोंडावर या समस्या अधिक गंभीर झाल्याने, रहिवाशांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संजय जांभळे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढला. यावेळी संजय जांभळे, अशोक मोकल, के पी पाटील, के जी पाटील, प्रदीप पाटील यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दररोज सरासरी ८ तास वीजपुरवठा खंडित होतो. यामुळे दैनंदिन जीवना बरोबरच लहान व्यवसाय आणि गणपती मूर्ती बनवणाऱ्या कारागिरांना मोठा फटका बसत

आहे. महावितरणचे कर्मचारी रीडिंग न घेता मनमानी पद्धतीने वाढीव बिले पाठवत आहेत. स्मार्ट मीटरचा जबरदस्तीने बसवू नये. डीपीमधून तेल गळत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. स्थिर आकार, इंधन आकार, वहन आकार आणि इतर छुपे शुल्क लावून ग्राहकांचे आर्थिक शोषण थांबवणे. अश्या विविध मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने मोर्चाचा पवित्रा घेतला असल्याचे संजय जांभळे यांनी सांगितले. यावेळी बडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांनी वीज वितरण कंपनी व नागरिक यामधील दुवा म्हणून काम करीत कायदा दिला नाही.अलिबाग हून आलेले शैलेश कुमार या अधिकाऱ्याने सकारात्मक प्रतिसाद करत मागण्यांबाबत लेखी पत्र दिले.

# झेडपी, पंचायत समिती गट, गणांबाबत निर्णय झाला

## २३ तक्रारी मान्य, ६९ हरकती फेटाळल्या / १८ ऑगस्टला अंतिम प्रभाग रचना होणार जाहीर

अहिल्यानगर । प्रशांत बाफना
जिल्हा प्रतिनिधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत २१ जुलैपर्यंत ९२ हरकती दाखल झाल्या होत्या. दाखल हरकतींवरील सुनावणी पूर्ण झाली असून, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी ६९ हरकती फेटाळल्या, तर २३ हरकती मान्य केल्या आहेत, अशी माहिती जिल्हा ग्रामपंचायत विभागाने दिली आहे. नाशिक विभागीय आयुक्तांनी ९२ हरकतींपैकी जामखेड, पारनेर, कोपरगाव आणि श्रीगोंदा तालुयांमधील २३ हरकती मान्य केल्या असून, उर्वरित ६९ हरकती फेटाळण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या गणाच्या रचनेवर ९२ हरकती दाखल झाल्या होत्या. त्यापैकी जामखेड तालुयातील ४४ हरकतींचा समावेश होता, तर पारनेरमध्ये १५, अकोले १०, नगर ८, संगमनेर ५, कर्जत ४, कोपरगाव आणि राहाता प्रत्येकी ३, श्रीगोंदा, जिल्हाधिकारी कार्यालय, शेवगाव आणि राहुरी तालुयात प्रत्येकी १, अशा हरकती नोंदवल्या गेल्या होत्या. नेवासा, श्रीरामपूर आणि पाथर्डी तालुयात कोणतीही हरकत दाखल नव्हती.

दाखल झालेल्या हरकती गट व गणातून गाव वगळणे किंवा समावेश करण्यासंबंधीच्या होत्या. १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण याच्या प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर केला होता. यावर २१ जुलैपर्यंत हरकती आणि सूचना देण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. प्रारूप प्रभाग रचनेत जिल्हा परिषदेचे ७५ गट आणि पंचायत समितीचे १५० गणांमध्ये समाविष्ट गावांची नावे आणि नकाशा जाहीर करण्यात आले होते. ही रचना २०११ च्या लोकसंख्येच्या आधारावर झेड पद्धतीने तयार करण्यात आली आहे.

अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून

१८ ऑगस्टला जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचा गट-गणांची अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार असल्याने लवकरच निवडणुकांचा धुरळा उडण्यास सुरुवात होणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अनेकांनी मैदान पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. निवडणूक जवळ आल्याने गावागावात अनेक पुढारी दिसू लागली आहेत. निवडणुकीसाठी अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले असल्याचे बोलले जात आहे.

# देगलूर महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन संपन्न

देगलूर :प्रतिनिधी

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व श्री समर्थ वाचनालय, देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने, ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्य व राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त भव्य ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले. प्रारंभी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, डॉ. अनिल चिद्रावार याच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ग्रंथप्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल डॉ. साईनाथ शिंदे, प्रा. डॉ. संजय पाटील, प्रा. दीपक वावधाने, प्रा. डॉ. सर्जेराव रणखांब, प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार,




प्रा. डॉ. एच. एम. लाकडे, प्रा. डॉ. संतोष येरावार, प्रा. गणेश क्यादारे, प्रा. महेश कुंडलीकर, समर्थ वाचनालयाचे ग्रंथपाल श्री पांडुरंग कदम, सहायक ग्रंथपाल, श्रीनिवास नाईक, श्री भीम कर्णे, श्री दीपक संगमकर, श्रीमती रेखा इळेगावकर व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ग्रंथप्रदर्शनामध्ये णझडउ व चझडउ व विविध स्पर्धा परीक्षेची पुस्तके व इतर संदर्भ ग्रंथांचा समावेश करण्यात आला होता.

# माळीवाडा परिसरात वेश्याव्यवसाय नागरिकांनी घेतला मोठा निर्णय, जर हे प्रकार

अहिल्यानगर । प्रशांत बाफना
जिल्हा प्रतिनिधी

नगर-माळीवाडा परिसरात वेश्याव्यवसाय व अंमली पदार्थांच्या विरोधात नागरिक त्रस्त झाले असून आज विविध सामाजिक संघटनांनी कोतवाली पोलिस ठाण्यात निवेदन सादर करून कठोर कारवाईची मागणी केली. नगरचे ग्रामदैवत विशाल गणपती मंदिर आणि महात्मा ज्योतिबा फुले पुतळा परिसरात खुलेआम वेश्याव्यवसाय सुरू असल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

या भागात मोठ्या प्रमाणावर निवासी घरे असून महिला व मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रात्री उशिरापर्यंत असामाजिक प्रकार घडत असल्याने परिसरातील



स्त्रिया, मुली व रहिवासी भयभीत आहेत.असे निवेदन संत शिरोमणी सावता महाराज उत्सव समिती, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती ,भिमशक्ती व माळीवाडा पंचमंडळ देवस्थान ट्रस्ट,या संघटना व माळीवाडा परिसरातील सर्व नागरिकांचे वतीने कोतवाली पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

बाबर बिल्डिंग परिसरात रात्री अल्पवयीन मुले गांजा व दारूचे सेवन करतात. नशा केल्यानंतर त्यांच्यात वैयक्तिक भांडणे होऊन मोठ्या आवाजात शिवीगाळ केली जाते, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होते. हा प्रकार भारतीय दंड संहिता कलम ३७०, ३७१ तसेच अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अंतर्गत गंभीर गुन्हा असून, संबंधितांवर तात्काळ गुप्त तपास करून कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा कृत्यांना कायमचा आळा घालावा, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी माळीवाडा देवस्थान,सावता महाराज उत्सव समिती, भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती आणि भिमशक्ती व माळीवाडा परिसरातील मोठ्या संख्नेने सामाजिक कार्यकर्ते व त्रस्त नागरिक भव्य संख्येने उपस्थित होते. जर हे प्रकार ८ दिवसात बंद झाले नाही तर आंदोलन करण्यात येणार आहे.

# आमदनी अठन्नी, खर्चा रुपया अशी मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांची स्थिती

मंठा (प्रतिनिधी) -

मंठा तालुक्यातील शेतकरी आज भीषण आर्थिक संकटात सापडले आहेत. आमदानी अठ्ठी, खर्चा रूपया अशी परिस्थिती निर्माण झाली असून शेतीतून होणारा नफा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. सततचे हवामानातील अनिश्चित बदल, वाढते उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता आणि कीटकनाशके, बियाणे व खते यांच्या प्रचंड दरवाढीमुळे शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी या हंगामात मोठ्या कष्टाने पेरणी केली. मात्र पावसाचा अतिरेक किंवा अभाव, पिकांचे नुकसान आणि बाजारपेठेत योग्य भाव न मिळाल्याने त्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. शेतीवरील खर्च वाढतच असून, उत्पन्न त्याच्या तुलनेत नगण्य आहे.

शेतकरी सांगतात की, उत्पादन खर्च भागवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. शेतीच्या कर्जाचा बोजा वाढत असून, अनेकांना कर्ज फेडणेही अशक्य झाले आहे. मागील तीन ते चार वर्षांपासून ही परिस्थिती कायम आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या मानसिक आणि आर्थिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

सरकारकडून तातडीने शेतमालाला हमीभाव, उत्पादन खर्चानुसार



भाव ठरविणे आणि आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देणे, या उपाययोजना राबविल्या गेल्यासच या संकटावर मात होऊ शकते, असा सूर तालुक्यातील शेतकरीवर्गातून उमटत आहे.

# डॉ. रंगनाथन जयंती साजरी




मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

कै .बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय अंतर्गत ग्रंथालय विभागाच्या वतीने दिनांक १२/० ८/२०२५ रोजी डॉ. रंगनाथन जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंचशील एकंबेकर व प्रमुख पाहुणे संस्था कार्यवाहक डॉ.चरणसिंग राठोड हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आनंद शिंदे यांनी केले. आपल्या भाषणामध्ये डॉ. चरणसिंग राठोड यांनी ' डॉ .रंगनाथन यांचे जीवन व कार्य ' या मथळ्यावर आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पवन एमेकर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार डॉ. सूर्यकांत कळसकर यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभागाचे श्री शंकर राठोड यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. उमाकांत बिरादार,डॉ. उत्तम मानवते, डॉ. अशोक साबणे, डॉ. सुनिता कांबळे, प्रा. शिलादेवी कांबळे, डॉ. बालाजी राठोड, प्रा.भरत बिरादार, श्री भाऊराव पवार, श्री जयप्रकाश झमकाडे, श्री मारुती चव्हाण, श्री संतोष सूर्यवाड, श्री व्यंकट वाघमारे, रोहित कांबळे आधी उपस्थित होती.

# सरकारी वकील सुनील रंगनाथ जोशीने स्वत:च्या पत्नीवर दाखल केलेला चोरीचा खोटा गुन्हा

## मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने केला रद्द

बीड /प्रतिनिधी

करमाळा जिल्हा सोलापूर येथील सहाय्यक सरकारी वकील सुनिल रंगनाथ जोशी यांनी स्वत:च्या पत्नीवर बीडमध्ये दाखल केलेला चोरीचा खोटा गुन्हा रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी फौजदारी अर्ज क्र. ४९४८.२०२४ अन्वये दिला आहे.



करमाळा, जि. सोलापूर येथे कार्यरत असलेले सहाय्यक सरकारी वकील सुनिल रंगनाथ जोशी यांनी पत्नी व दोन अपत्यांचा संसार असतानांही दि. २६ ऑक्टोबर २०२३ रोजी आळंदी देवाची, जि. पुणे येथे जावून दुसरा बेकायदेशीर विवाह केला आहे. त्यामुळे त्यांच्या पत्नीने दि. ५ डिसेंबर २०२३ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे भा.दं.वि. कलम ४९४, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ अन्वये गु.र.नं. ६२३/२०२३ नुसार गुन्हा नोंदवला होता. यानंतर सुडभावनेतून सहाय्यक सरकारी वकील सुनिल रंगनाथ जोशी यांनी पदाचा गैरवापर करून दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५०८/२०२४ नुसार स्वत:ची पत्नी, नातेवाईक व साक्षीदार यांच्यावर चोरीचा खोटा गुन्हा दाखल केला होता. सदरील खोटा गुन्हा रद्द करण्यासाठी पीडितांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. सुनावणी दरम्यान मा.न्यायालयाने सर्व बाजुची पडताळणी केली असता पत्नी, नातेवाईक व साक्षीदार यांच्यावर दाखल केलेला चोरीचा गुन्हा हा खोटा असल्याचे नमूद करत तो रद्द केला आहे. पत्नी, नातेवाईक व साक्षीदाराच्यावतीने ॲड. सुदर्शन साळुंके यांनी भक्कमपणे बाजू मांडली. मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयामुळे सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

# ग्रामदैवत श्री सिध्देश्वराची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते महाआरती

लातूर (प्रतिनिधी)

पवित्र श्रावण महिना सुरू असून या महिन्यात भगवान शंकराची आराधना करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर श्रावण महिन्यातील तिसजया सोमवारचे औचित्य साधून ग्रामदैवत श्री सिध्देश्वर रत्नेश्वराची महाआरती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते करण्यातआली. तसेच यावेळी सहधर्मादाय आयुक्त ससाणे यांनीही आपल्या पत्नीसमवेत आरती केली.



श्रावण महिना सुरू असून या महिन्यात भगवान शंकराची आराधना अतिशय मनोभावे करण्यात येते. विशेषत: श्रावण महिन्यात सोमवारी अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळेच तिसजया सोमवारचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानला भेट देवून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांच्या हस्ते श्री सिध्देश्वराची महाआरती करण्यात आली. यावेळी सहधर्मादाय आयुक्त ससाणे यांनीही आपल्या पत्नीसमवेत श्री सिध्देश्वराची महाआरती केली. यावेळी देवस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, प्रशासक सचिन जांबूतकर, अशोक भोसले, महाआरती समितीप्रमुख विशाल झांबरे, तलाठी दत्ता शिंदे, सचिन आलमले, तुकाराम जगताप, अनिकेत जाधव, आकाश सौदागर आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी देवस्थानच्या वतीने ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांचा सत्कार केला. यावेळी देवस्थान परिसरात सुरु असलेल्या तिर्थकुंडाच्या कामाची पाहणी जिल्हाधिकारी यांनी करून या कामास निधी कमतरता पडणार नाही, अशी ग्वाही दिली.

# दहा वर्षांनी आला दुर्मिळ अंगारक संकष्टी योग पैठणच्या नागघाटावर पेशवे गणपती दर्शनासाठी गर्दी.....



पैठण ।प्रतिनिधी

दहा वर्षांनी श्रावण महिन्यातील मंगळवारी दि. १२ ला दुर्मिळ योगावर संकष्टी अंगारक चतुर्थी पर्वावर नागघाट तीर्थावलीवर गणपती भक्तांनी गोदावरी स्नान करून पेशवे गणपतीचा अभिषेक करण्यासाठी गर्दी केली होती माधवराव पेशवे हे नेहमी पैठणच्या वैभव संपन्न नगरीचे भरभरून कौतुक करीत असत त्यामुळे पेशवे कुटुंबियांचे पैठण हे आवडते शहर होते. सण १७६३ मध्ये माधवराव पेशव्यांनी जुन्या पैठण मधील शालिवाहन नगरीतील पवित्र नागघाटास भेट दिली व या पुण्य स्थळी भव्य गणपती मूर्तीची स्थापना केली यावेळी पैठणकरांनी गर्दीच गर्दी केली होती, पैठणचे जगप्रसिद्ध लड्डू सावकारांनी माधवराव पेशव्यांना विशेष भोजनाचे आमंत्रण दिले पैठणकर ही आवर्जून भोजनास उपस्थित राहिले तेव्हापासून शेकडो पिढ्या पासून गणपती भक्तगण दर्शनासाठी आवर्जून येतात. अशी माहिती पुरोहित कमलाकर बुवा शिवपुरी व संतोष कुलकर्णी यांनी दिली. प्रत्येक महिन्याच्या संकष्टी चतुर्थीला भक्तगण गणपती अभिषेक करून नैवेद्य भोजन पंगती घालतात, महाराष्ट्रातील गणपती भक्त गणपतीच्या दर्शनासाठी आवर्जून पैठणला येतात गणपती मंदिराची देखभाल नागघाट भक्तगण करतात.तसेच याच नागघाटावर संत ज्ञानेश्वर महाराजांनी रेड्या मुखी वेद वदवून धर्मपीठाचा पराभव केला होता.

# जिल्हा परिषदेच्या १६ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना कनिष्ठ सहाय्यक लिपिकपदी पदोन्नती

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा परिषदेच्या चतुर्थ श्रेणी गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना दोन नदीचे आदेश बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी ५ ऑगस्ट २०२५ रोजी दिले आहेत. कर्मचाऱ्यांच्या अनेक दिवसापासून पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. सदर पदोन्नती देण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याचे ऋण व्यक्त करून आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान जिल्हा परिषदेचे सीईओ रहमान यांनी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, बदली, आणि विविध प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक काम सुरू असल्याचे दिसून आले आहे.



जिल्हा परिषदेच्या पदोन्नती निवड समितीने पात्र १६ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. खालील कर्मचाऱ्यांना पदोन्नती घेऊन पदस्थापना पुढील प्रमाणे दिली आहे. १) होनराव संजू शिवलिंग आप्पा- शिक्षण विभाग, जि. प. बीड, २) बोबडे दत्तात्रय लक्ष्मण - आरोग्य विभाग, जि. प., बीड ३) गुजर श्रीकृष्ण जालिंदर - प्राथमिक आरोग्य केंद्र, विडा ४) गुंड बन्सी देविदास- प्राथमिक आरोग्य केंद्र धर्मापुरी ५) श्रीमती जाधव सुरेखा रामदास- नवगण राजुरी ६) श्रीमती चांभारे सीमा विष्णू- पंचायत समिती, माजलगाव ७) रंगदळ शरद माणिक- मा.शा. पात्रुड ८) श्रीमती सोनवणे सुनिता राजू - बांधकाम विभाग क्र.२ ९) श्रीमती चाटे उषा महादेव - पंचायत समिती, केज १०) श्रीमती धुमाळ आशाबाई सिताराम- पंचायत समिती, परळी ११) कांबळे रामेश्वर श्रीपती - प्रा. आरोग्य केंद्र, पात्रुड १२) पाटील लक्ष्मीकांत पुरुषोत्तम - गटशिक्षणाधिकारी पं.स. माजलगाव १३) जोशी संतोष हरिभाऊ- प्रा. आरोग्य केंद्र, आपेगाव१४) पुजारी रंजिता निवृत्तीराव- पं.स. परळी १५) जाधव गजानन देविदास - बालविकास प्रकल्प अधिकारी गेवराई १६) रोकडे महेश बाबुराव- शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड.बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या अध्यक्षतेखाली प्रदीप काकडे, उपमुख्य अधिकारी सामान्य प्रशासन प्रदीप काकडे, श्रीमती मेश्राम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, आणि लेखा व वित्त अधिकारी जि. प. बीड यांच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीस मान्यता दिली. सदर पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहाय्यक प्रशासन अधिकारी नवले, कनिष्ठ प्रशासन अधिकारी संतोष गायकवाड, वरिष्ठ सहाय्यक श्रीमती स्वाती आम्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सावरकर महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन ग्रंथप्रदर्शनाने साजरा

## वाचाल तर वाचाल - किशोरकुमार बाहेती

बीड ।प्रतिनिधी

भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३३ व्या जयंती निमित्त १२ ऑगस्ट रोजी स्वा.सावरकर महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिन ग्रंथालय विभागाच्यावतीने साजरा करण्यात आला. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालयशास्त्रातील योगदानाचे महत्त्व व त्यांच्या कार्याचा गौरव आणि त्याच्या स्मरणार्थ ' राष्ट्रीय ग्रंथपाल दिन ' साजरा केला जातो असे ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी विशद केले. प्रमुख अतिथी श्री किशोरकुमार बाहेती, सहसचिव, राजस्थानी सेवा समाज संस्था, बीड, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रम प्रसंगी ' वाचल तर वाचल ' या विषयी अतिथिनी विद्यार्थांना वाचनासाठी प्रोत्साहित केले. अध्यक्ष प्रोफेसर सुहास मोराळे यांनी डॉ. रंगनाथन यांच्या कार्यापासून सर्व ग्रंथपालांनी प्रेरणा घेतली पाहिजे असे नमूद केले.कार्यक्रमा प्रसंगी उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर, डॉ. उत्तम साळवे, विज्ञान विभागाच्या अधिष्ठाता डॉ. रूपाली कुलकर्णी, वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता डॉ. रमेश खंडागळे, ग्रंथालय समिती सदस्य, सर्व सहकारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा संजय काळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर, श्री बाळासाहेब वाघमारे व श्री सचिन चौरे यांनी प्रयत्न केले.



# गायरान नियमित करणे व इतर प्रश्नावर न.प.सीओ शैलेश फडसे यांच्यासोबत सरात्मक चर्चा - अशोक वीर

बीड ।प्रतिनिधी

गायरान धारकांचे प्रश्न आणि मुरमाची आवश्यकता, गायरान धारकांचा विषय अजित पवार आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांनी गायरान धारकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी अतिक्रमण करणाऱ्या रहिवाशांच्या नावांची यादी मागितली आहे,

ज्यामुळे गायरानावर राहणाऱ्या लोकांचे हक्क सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सर्व गायरान धारकांना पीटीआर (प्रमाणपत्र) देण्याचे आश्वासन दिले गेले आहे.ज्यामुळे त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारेल. चिखल झालेल्या ठिकाणी मुरमाची आवश्यकता याशिवाय, बार्शी नाका विभागातील काही भागात मुरमाची आवश्यकता असल्याबद्दल एक महत्त्वाचे निवेदन दिले गेले आहे. ढोले वस्ती, अशोक नगर, दुधाळ कॉलनी, प्रकाश आंबेडकर नगर, ढगे कॉलनी आणि इतर वसतींमध्ये रस्ते आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या मुरमामुळे स्थानिक नागरिकांचे जीवन सुगम होण्यास मदत होईल. रस्ते बांधकामामुळे येथे शैक्षणिक व व्यावसायिक क्रियाकलापांना थोडी अधिक चालना मिळेल.या



सर्व चर्चेच्या वेळी जेष्ठ नेते आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते, ज्यात अशोक वीर, सचिन बोबडे, अमोल अहिरे, बबलू पवार, शेख जमील, अशोक वाघमारे यांचा समावेश होता. त्यांच्या सहकार्याने स्थानिक समस्यांचे निराकरण करण्यात अधिक सुसंगतता आणण्याची अपेक्षा आहे.

स्थानिक विकासासाठी सर्वांची एकत्रित भागीदारी आवश्यक आहे. योग्य व तात्काळ कारवाई करून रस्ते आणि इतर विकास कार्यांना गती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा कामांमुळे स्थानिक विकासाला ना केवळ धारणा मिळेल, तर रस्त्यांची स्थिती सुधारेल आणि त्याबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल.सर्व सहभागी व्यक्तींच्या एकजुटीमुळे आणि सुसंगत कार्यपद्धतीद्वारे स्थानिक समस्यांचे समाधान करणे शक्य होईल, हे विचारांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

# विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे निश्चित ठराविक कालमर्यादेत निकाली काढन्याची बार्टी महासंचालक डॉ सुनिल वारे यांना संतुजी ब्रिगेडची मागणी

लातूर ।प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी)पुणे महासंचालक डॉ सुनिल वारे यांची भेट घेत निवेदनाद्वारे अखिल भारतीय संतुजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष ॲड प्रदिपसिंह गंगणे , महासचिव ॲड अमितकुमार कोथमिरे यांनी विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे निश्चित ठराविक कालमर्यादेत निकाली काढण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्रातील ११/१२ वर्गात विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व भविष्यात वैद्यकीय,अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र,नर्सिंग,एम.बी.ए,एल.एल.बी आदी व्यावसायिक महाविद्यालयात अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमाती,ओबीसी, एस.इ.बी सी , एन.टी आदी प्रवर्गाच्या आरक्षणातून प्रवेश घेण्यासाठी वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते. महाराष्ट्रातील विविध जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीकडे विहित नमुन्यात व मुदतीत विद्यार्थी प्रस्ताव सादर करून ही अनेक प्रस्ताव प्रलबित राहत आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थी व पालकांना जात पडताळणी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागते यासाठी मानसिक त्रास ही सहन करावा लागतो आहे,विद्यार्थ्यांना पावती आधारे प्रवेशासाठी नोंदणी करता येते पण प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ठराविक मोजका तीन ते चार दिवसाचाच कालावधी दिला जातो, मुदतीत वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन सादर न केल्यास अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक नुकसानिस सामोरे जाण्याची भिती आहे.



त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन विद्यार्थी व पालकांनची गैरसोय होवु नये,कोणाचेही जात वैधता प्रमाणपत्र अभावी शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे सी इ टी,नीट, विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे निकाल जाहीर होण्यापूर्वीच निश्चित ठराविक कालमर्यादेत जुलै अखेर निकाली काढणे बाबत उचित निर्देश जिल्हास्तरिय जात पडताळणी समित्यांना देण्यात यावेत तसेच अनेक कुटुंब जवळपास ४०/५० वर्ष मुबई,पुणे,नाशिक व अन्य ठिकाणी पोटापाण्यासाठी स्थलांतरीत झालेले आहेत तर काही महिला कौटुंबीक कलहातून व घटस्फोट झाल्याने माहेरी स्थायिक झाल्याने त्यांच्या तीन/चार पिढ्याचा जन्म,शिक्षण, विवाह आदी झालेले आहेत,त्यांनी किवा त्याच्या पुढील पिढचानी शिक्षणासाठी ,घरकुलासाठी,नोकरी आदी कारणासाठी कायद्याच्या अज्ञानपणामुळे जात प्रमाणपत्र काढलेली आहेत तर अनेक जनाची जात प्रमाणपत्र पडताळणी होऊन होवून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली आहेत अशा परिस्थितीत इतर त्यांच्याच रक्तनातेवाईकाना महाराष्ट्र अनुसूचित जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग जात प्रमाणपत्र देण्याचे अधिनियम २००० व नियम २०१२ कलम ५ (१) अन्वये अर्जदार स्वतः किवा त्यांच्याकडील किवा पणजोबा किवा नातेवाईक हे मानवी दिनाकास ज्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रादेशिक अधिकारितेच्या क्षेत्राच्या आत सर्वसाधारणताः राहत होते त्या सक्षम प्राधिकाऱ्याला अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देता येईल,तसेच नियम २०१२ कलम ५(२) अन्वये अर्जदार किवा त्यांचे वडील किंवा पणजोबा त्या सक्षम प्राधिकरणाच्या अधिकारितेच्या क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी सर्वसाधारण रहिवाशी नसतील तर,अशा क्षेत्रामधील नोकरी,रोजगार,शिक्षण किवा तुरूगातील बंदिवास इत्यादी कारणाने अशा क्षेत्रात अर्जदाराच्या तात्पुरत्या राहण्यामुळे त्या सक्षम प्राधिकार्यास जातीचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकारिता प्रदान केले जाणार नाही यामुळे प्रमाणपत्र,वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ही अट शिथिल केल्यास विद्यार्थी,पालकांची गैरसोय दूर करण्या बाबत उचित निर्णय घेवून कार्यवाही करण्याबाबत जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीना निर्देश द्यावेत ही विनंती करण्यात आली आहे.

# केज तहसीलसमोर केविसंस चे १४ ऑगस्ट पासून बसडेपो,रिंगरोड व शेतकरी प्रश्नावर उपोषण

केज/प्रतिनिधी

केज येथे बसडेपो सुरु करा,केज शहरासाठी रिंगरोड (बायपास किंवा उड्डाणपुल यापैकी हे सोयीचे व फायद्याचे असेल ते),केज शहरातील शेतकऱ्यांना राज्य व केंद्राच्या सर्व कृषी योजनांचे लाभ तात्काळ सुरु करा तसेच संजय गांधी निराधार योजना लाभार्थींची दलालां कडून होणारी लूट थांबवण्यासाठी तहसील कार्यालयाने थेट त्यांच्याशीच पत्रव्यवहार करावेत या प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समिती च्या वतीने येत्या शुक्रवार दि.१४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपासून केज तहसील कार्यालया समोर बेमुदत उपोषण सुरु करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिली आहे.या बाबतचे निवेदन सर्व संबंधित विभागाला समितीच्या वतीने देण्यात आले आहे.निवेदनात म्हटले आहे की,केज येथे बसआगार सुरु करण्या साठी केज विकास संघर्ष समिती गेली अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी केज शहरात बीड रोड लगत साडेसात एकर जागा आरक्षित आहे.केज शहर सध्या खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणीवर आहे.केज तालुका अंतर्गत एकशे दहा गांवे



आहेत.दररोज हजारो प्रवाशी केज शहरातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करतात.केज येथून बस गाड्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी केज येथे बसडेपो सुरु करावा तसेच या जागेवर नवीन इलेक्ट्रिक बसगाडयांना लागणारे भव्य चार्जिंग सेंटर उभा करावे अशी मागणी समितीने राज्य परिवहन महामंडळा कडे निवेदनाद्वारे केली आहे.केज शहरातुन वरील दोन्ही प्रमुख महामार्ग भवानी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत एकत्र येऊन पुढे जातात.या अंतरात शहरातील वाहतूक खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे.सर्व प्रकारच्या वाहणा बरोबरच अवजड वाहनांचीसंख्या वाढली आहे.यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील महामार्गांवर अपघाताचे व सततची वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.म्हणून केज शहरासाठी तात्काळ रिंगरोड (बायपास किंवा उड्डाणपूल यापैकी केज शहरासाठी जे सोयीचे व फायद्याचे असेल त्यास मंजुरी द्यावी अशी मागणी संबंधित विभागाकडे केली आहे.याव्यतिरिक्त केजच्या शेतकऱ्यांना केज येथे नगरपंचायत झाल्यापासून केंद्र व राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शासकीय कृषी योजनांचा लाभ नाकारण्यात आला आहे.हे अत्यंत चुकीचे आहे.शासनाने शेतकऱ्यांमध्ये भेद करू नये.विशेष म्हणजे राज्यात जेवढ्या नगरपंचायत व नगर परिषदा आहेत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांवर तांत्रिक मुद्दे पुढे करून अन्याय केला जात आहे.तरी केज शहर नगरपंचायत अंतर्गत सर्वशेतकऱ्यांना तात्काळ सर्व शासकीय योजनांचे लाभ सुरु करावेत अशी मागणीही समितीने केली आहे.

समितीने केज तहसील अंतर्गत संजय गांधी व श्रावणबाळ निराधारांना मिळणाऱ्या लाभाची दलालांकडून होणाऱ्या लुटीबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे.यापूर्वी या सर्व लाभार्थींनाआपल्या अर्ज मंजुरी,त्रुटी किंवा अर्ज नाकारण्यात आल्यास सरळ तालुका प्रशासन पत्राद्वारे लेखी माहिती देत होते मात्र सध्या ही माहिती प्रशासनाकडून संबंधित लाभार्थींना पत्राद्वारे मिळत नसल्याने कांही दलाल लोक त्यांना चुकीची माहिती देऊन व दिशाभूल करून अवाजवी लूट करत आहेत.यासाठी सर्व लाभार्थींना तालुका प्रशासनाने सर्व माहिती लेखी पत्राद्वारेच कळवावी जेणेकडून त्यांची दलालां कडून लूट होणार नाही अशी मागणीही केज विकास संघर्ष समितीने संबंधित विभागाकडे केली आहे.

वरील सर्व मागण्या करिता केज विकास संघर्ष समितीच्या वतीने येत्या शुक्रवार दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून केज तहसीलकार्यालया समोर बेमुदत अमरण उपोषण सुरु करण्यात येणार आहे.केज वासियांनी या उपोषणास आपला पाठिंबा द्यावा असे आवाहनही सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे. निवेदनावर नासेर मुंडे, शेषराव घोरपडे,इंजि. मोहनराव कराड, नारायण पंढरीनाथ बिक्कड,संपत वाघमारे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर प्रकरणी चौकशी समिती गठीत करा – सय्यद सलीम बापू

बीड ।प्रतिनिधी

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंग प्रकरणी विशेष चौकशी समिती गठींकरून दोषींवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे. परळी येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी ऐतिहासिक देवस्थान नासर जंग दर्गा असून सदरील दर्गेला खिदमत माश एकूण १७८ एकर इनामी जमीन आहे.गेल्या काही वर्षांपासून सदरील देवस्थान मिळकतीवर येथील स्थानिक भूमाफिया यांचा डोळा असून ते सतत देवस्थान इनामी जमीन लाटण्याचा प्रयत्न करीत आहे. ऐतिहासिक दर्गा नासर जंगच्या मिळकतीवर अतिक्रमण करून टोले जंग इमारती बांधली जात असून सदरील मिळकतीच्या बोगस फेरफार करून पी.टी.आर व पी.आर कार्ड सुद्धा देण्यात आले आहे.तरी या प्रकरणी आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने वेळोवेळी निवेदने देऊन प्रकरण उघडगीस आणण्याचे काम केले आहे.



येथील भूमाफिया यांनी परळी नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व पुरातत्व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केले.याप्रकरणी मी स्वतः परळी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना ऐतिहासिक पुरावे का नष्ट केली जात आहे ? असे प्रश्न विचारले असता त्यांनी उडवा - उडवीची उत्तरे दिली.व त्यानंतर मी वक्फ मंडळाचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरणाची माहिती दिली असता त्यांनी तात्काळ जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रकरणाची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणार असल्याची माहिती दिली. तरी सद्यस्थितीत जिल्हा वक्फ अधिकारी यांनी सदरील प्रकरणात कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही.

तरी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाअंतर्गत येणाऱ्या ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व परतत्व पुरावे नष्ट करण्याचे प्रयत्न हे अत्यंत गंभीर असून हे सर्व प्रकार परळी येथे भूमाफिया,तलाठी,मंडळ, अधिकारी,तालुका निबंध आणि परळी नगर परिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने होत आहे.या प्रकरणी विशेष चौकशी समिती गठीत करून दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे अन्यथा येत्या १८ ऑगस्ट शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदादा मरण उपोषण करण्यात येईल असे आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.यावेळी एड.सय्यद अल्ताफ, सय्यद इलियास भाई व समीर सिद्धीकी सह आंबेडकरी विचार मोर्चाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्मार्ट मीटर नव्हे, स्मार्ट शिक्षणाची गरज
## मंठा तालुक्यातील पालकांचा महावितरणला इशारा

डॉ. आशिष तिवारी / मंठा -.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (एमएससीबी) कडून मोठा शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम राबवली जात आहे. मात्र, मंठा तालुका व परिसरातील पालकांचा ठाम सवाल आहे - विद्युत मीटर स्मार्ट केल्याने गावाचा विकास होणार की शिक्षण स्मार्ट केल्याने ?मंठा शहर व ग्रामीण भागात २४ तासांच्या आत सरासरी (दर) अर्ध्या तासाला वीजपुरवठा खंडित होतो. या वारंवार होणाऱ्या वीजबंदोबस्तामुळे विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन तसेच ऑफलाईन अभ्यासात गंभीर अडथळे निर्माण होतात. संगणक, इंटरनेट, डिजिटल क्लासेस यांचा योग्य वापर होऊ शकत नाही.

गावकरी व पालकांनी स्पष्ट केले की, शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत गरजा पूर्ण करणे हीच खरी स्मार्ट योजना आहे. स्मार्ट मीटर बसवण्याऐवजी महावितरणने वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर



द्यावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.पालकांनी महावितरणला आवाहन केले आहे की, स्मार्ट मीटरपेक्षा वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करून, नियमित व अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करावा. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून दीर्घकालीन नियोजन व तातडीने सुधारणा करणे हीच खरी स्मार्ट पॉलिसी ठरेल, असे मंठा शहरासह तालुक्यातील नागरिकांचे (जनतेचे) मत आहे.

# गोरगरीबांच्या अतिक्रमणावर हातोडा, भुमाफियांना पायघड्या ?

**प्रशासनाच्या दुटप्पी धोरणाविरोधात मक्याचे कणसं भाजुन मोफत वाटप करत लक्ष्यवेधी आंदोलन - डॉ. गणेश ढवळे**

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील जिल्हा आणि नगरपालिका प्रशासन अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेत हातावर पोट भरणाऱ्या चहा-नाष्टा चालक, टपरीधारक, फळ विक्रेते, फुलहार विक्रेते अशा गोरगरिबांवर निर्दयपणे कारवाई करत आहे. मात्र शहरातील राखीव खुल्या जागा आणि बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांची बेकायदेशीर बांधकामे मात्र विनाविघ्न सुरूच आहेत.

प्रशासनाच्या या दुटप्पी धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र




राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.१२, ऑगस्ट मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मक्याची कणसे भात्यावर भाजुन मोफत वाटप करत लक्ष्यवेधी आंदोलन आले. जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, शेख मुस्ताक, शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे, रामधन जमाले, रामनाथ खोड , बाळासाहेब मोरे,माजी सैनिक अशोक येडे, आप्पासाहेब मतकर,मोमीन रफीक, दिलीप जोशी, मोमीन आरबाझ, प्रा.डी.जी.तांदळे, मोमीन अलतमश आदींचा सहभाग होता.

# नियमित व्यायामामुळे आरोग्य सुदृढ व निरोगी राहते - प्रोफेसर डॉ. बालाजी नवले

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय युवक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये धारूर ग्रामीण रुग्णालयातील एचआयव्ही समुपदेशक प्रेमानंद स्वामी यांनी रासेयो स्वयंसेवकांची संवाद साधला.

यावेळी ते म्हणाले की, आरोग्य हीच खरी संपत्ती असून उत्तम आरोग्यासाठी उत्तम आहार, व्यायाम व योगा करणे गरजेचे. व्यायामाने मन प्रसन्न व उत्साही राहते असे सांगितले. आंतरराष्ट्रीय युवक दिनानिमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून प्रोफेसर डॉ. बालाजी नवले यांनी उत्तम आरोग्यदायी




जीवनासाठी युवकांनी नियमितपणे व्यायाम करून जीवन निरोगी व आरोग्यदायी ठेवावे. तसेच हर घर तिरंगा घर घर तिरंगा याविषयी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना भारतीय ध्वज संहितेचे महत्त्व समजावून स्वयंसेवकांनी देशभक्ती जोपासावी असे सांगितले. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संपन्न भारतासाठी निरोगी व उत्तम आरोग्याने परिपूर्ण युवक निर्माण व्हावेत असे सांगितले. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांबरोबरच महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नागोराव वाघमारे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मानले.

# इतिहास महाराष्ट्राचा स्पर्धेची बीडमध्ये उत्साही सुरुवात

**बालकलावंतांच्या कलागुणांनी रसिक मंत्रमुग्ध, ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग**

बीड ।प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचलित सौ. के. एस. के. महाविद्यालयात बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित 'इतिहास महाराष्ट्राचा' या स्पर्धेची प्राथमिक फेरी मंगळवारी (दि.१२) उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे उद्घाटन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित होते. उद्घाटक आणि प्रमुख अतिथींनी सर्व बालकलावंतांना शुभेच्छा देत त्यांना प्रोत्साहन दिले.

नृत्य, नाटच, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वक्तृत्व,




पोवाडे यांसारख्या विविध कलाप्रकारांची आकर्षक सादरीकरणे बालकलावंतांनी सादर केली. बीड, गेवराई, माजलगाव, उमरी आणि आसपासच्या गावांतील शालेय विद्यार्थ्यांसह काही सांस्कृतिक संस्थांनी सहभाग घेतला. या प्राथमिक फेरीत 'श्री शिवजन्मोत्सव ते श्री शिवराज्याभिषेक सोहळा' या विषयावर बालकलाकारांनी नाटक, पोवाडे, गाणी अशा विविध माध्यमांतून प्रभावी सादरीकरण केले. यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर, सहकार्यवाहक स्नेहलता पाठक, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, प्रमुख कार्यवाहक संजय पाटील देवळांकर, कोषाध्यक्ष डॉ. व्ही. टी. देशमाने, सहकार्यवाहक शाहीर विलास सोनवणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

# कोठी येथे विकासाचा उत्सव ग्रामपंचायत भवनासह विविध कामांचे लोकार्पण

महंत ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री,खा. बजरंग बप्पा सोनवणे, माजी आमदार संगीता ठोंबरे यांची उपस्थिती

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे कोठी येथे ग्रामपंचायत भवनासह रस्ते,पाणी पुरवठा,प्रकाश व्यवस्था आणि इतर सार्वजनिक सोयीसुविधांच्या विविध कामांचा भव्य दिव्य लोकार्पण सोहळा रविवार दि.१० आगष्ट रोजी जल्लोषात पार पडला.ग्रामस्थांचा उत्साह आणि मान्यवरांची उपस्थिती यामुळे कार्यक्रमाला विशेष ऊर्जा भरली होती.

नव्याने बांधलेले ग्राम पंचायत भवन हे केवळ एक कार्यालय नसून गावाच्या प्रगतीचे केंद्रस्थान ठरणार आहे. सोबतच रस्ते




दुरुस्ती, पाणीपुरवठा सुधारणा, वीजप्रकाश व्यवस्था आणि इतर महत्त्वाच्या कामांचे उद्घाटन करण्यात आले.महंत ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री वरपगावकर यांच्या शुभहस्ते झाले. अध्यक्षस्थान रामराजे डोंगरे यांनी भूषविले, उद्घाटक म्हणून बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग बप्पा सोनवणे आणि प्रमुख पाहुणे माजी आमदार संगीताताई ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी कोठी गावाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.तसेच कोठीचे उपसरपंच बप्पा डोंगरे यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य पिंटू ठोंबरे,बंडू चौधरी,शेकाप नेते भाई मोहन गुंड,माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर चौरे, केजचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड,विलास जोगदंड,ग्रामसेवक गोरे मॅडम व पंचक्रोशीतील विविध गावांचे सरपंच, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जालना अंकुशराव टोपे महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयाचे जनक पद्मभूषण डॉ.एस.आर. रंगनाथन यांची जयंती साजरी

जालना ।प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथील ग्रंथालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मभूषण डॉ. एस. आर. रंगनाथन यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. या वेळी मस्त्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड यांच्या हस्ते पद्मभूषण डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना वाचन संस्कृती वाढवण्यासाठी ग्रंथालय व शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजे तरच वाचन संस्कृती टिकेल आणि वाढेल, तसेच ज्ञानात भर पडेल,असे मत डॉ. बी. आर. गायकवाड यांनी व्यक्त केले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, क्रीडा संचालक डॉ. भुजंगराव डावखर, डॉ. शंकर तिकांडे, प्रा. डी. जे. शिंदे, प्रा. बाळासाहेब लुंगाडे, प्रा. जी. बी. गुंजाळ, प्रा. महेश डोईफोडे, प्रा. ए. पी. गडदे , ग्रंथालय कर्मचारी श्री. ज्ञानेश्वर वाजे , सौ. अरुणा कुरणकर, श्री. कुणाल शिंदे, श्री. लखन बारवाल सौ. पूजा लोंढे, श्री. बबन भूसारे, वसंत हिवाळे व कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंघोळ करत असतानाना विजेचा धक्का लागून तरुणाचा दुर्दैवी अंत



शहागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील गोरी येथील रहिवासी सतीश वसंत तिळवणे (वय ३५) या अविवाहित तरुणाचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी सकाळी घरात आंघोळ करत असताना ही घटना घडली. सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सतीश आपल्या राहत्या घरातील बाथरूममध्ये आंघोळ करत होते. त्यावेळी बाथरूममधील बल्बच्या उघड्या तारेला त्यांचा स्पर्श झाला आणि त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. या धक्क्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे गोरी-गंधारी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सतीश यांच्या पश्चात आई, वडील आणि लहान भाऊ असा परिवार आहे. गोदावरी नदीकाठी सोमवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# स्वामी विवेकानंद विद्यामंदिर येथे मानवनिर्मित बायोमेट्रिक हजेरी प्रणाली व नवनिर्वाचित वर्ग मंत्रिमंडळ विस्तार उद्घाटन संपन्न

केज/प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये मानवनिर्मित बायोमेट्रिक हजेरी प्रणाली व नवनिर्वाचित वर्ग मंत्रिमंडळ विस्तार उद्घाटन दि.८ ऑगस्ट २०२५ वार शुक्रवार रोजी संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती शैलाताई इंगळे व उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ केज संस्थेचे सचिव श्री. जी.बी.गदळे सर हे उपस्थित होते.तसेच मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे या देखील उपस्थित होत्या.इयत्ता ७ वी अ चे वर्गशिक्षक प्रबोधकांत समुद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे संपूर्णकार्य सुव्यवस्थित पार पाडले.पाहुण्यांचे स्वागत सुजनांचे स्वागत करूया चला या स्वागत गीताने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.उपक्रम निर्माण करताना घेतलेले परिश्रम त्यामध्ये त्यांना मिळालेले सहकार्य याबद्दल माहिती देत शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास



बौद्धिक, मानसिक,शारीरिक, सामाजिक,भावनिक व नैतिक विकास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी या पैलून मधून साकार झालेली ही संकल्पना या उपक्रमांच्या माध्यमातून विकसित करण्याचा हा प्रयत्न असे त्यांनी सांगितले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,आत्मनिर्भरता हे गुण विकसित होतात असे ते म्हणाले. प्रस्ताविकानंतर पाहुण्यांच्या हस्ते या दोन उपक्रमांचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. मानवनिर्मित बायोमेट्रिक हजेरी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी घेतली जाते यामुळे वेळेची बचत होते,विद्यार्थ्यांना शिस्त लागते,विद्यार्थी आत्मनिर्भर बनतात. पुढे वर्ग मंत्रिमंडळ शपथविधी पार पडला त्यामध्ये आर्या लटपटे-मुख्यमंत्री,शौर्य बारगजे - उपमुख्यमंत्री,समृद्धी नेहरकर-गृहमंत्री, अपूर्वा सोनवणे-शिक्षणमंत्री,गुंजन घोळवे-शिक्षणमंत्री, श्रावणी लोंढे- नियोजन मंत्री,श्रेया धपाटे-आरोग्यमंत्री,किशोरी मुळे-वित्तमंत्री,सृष्टी अडसूळ- पर्यावरण मंत्री,सिद्धी क्षीरसागर- सांस्कृतिक मंत्री, संस्कृती गायकवाड-सांस्कृतिक मंत्री, तेजस्विनी कापरे-प्रसिद्धी मंत्री या वर्गमंत्र्यांनी शपथ विधी घेऊन कार्यभार स्वीकारला.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा विद्यार्थ्यांमध्ये शिस्त रुजावी वेळेचे नियोजन हे गुण विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमांमधून रुजण्यास चालना मिळते असे उद्गार करून वर्ग शिक्षकाचे अभिनंदन करून उद्घाटक श्री. जी.बी.गदळे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.मुख्याध्यापक शिवनंदा मुळे मॅडम यांनी ही या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होईल असे त्या म्हणाल्या.अध्यक्षीय समारोपामध्ये बोलताना श्रीमती शैलाताई इंगळे मॅडम असे म्हणाल्या की,पूर्ण शाळेने तुमच्या वर्गाचा आदर्श घ्यावा वर्षभर हा उपक्रम असाच सुरळीत चालावा उपक्रमातच नव्हे तर अभ्यासातही तुमचा वर्ग अव्वल असावा व त्यासाठी तुम्ही प्रयत्नशील राहावे असे त्या म्हणाल्या.सर्व वर्ग मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी मान्यवरांच्या साक्षीने शपथ घेऊन आपला पदभार स्वीकारला.या सर्व कार्यक्रमामध्ये वर्ग शिक्षक समुद्रे पी.एस. यांचे मोलाचे असे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन सांस्कृतिक मंत्री सिद्धी क्षीरसागर हिने केले तर आभार दुसरी सांस्कृतिक मंत्री संस्कृती गायकवाड हिने मानले.